संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## विद्यापीठाच्यावतीने 'स्कील्स फॉर न्यु एज्युकेशनल आर्किटेक्चर' विषयावर ऑनलाईन वार्षिक रिर्फेशर अभ्यासक्रमाचे आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील यु.जी.सी.-एच.आर.डी.सी. च्या वतीने 'स्कील्स फॉर न्यु एज्युकेशनल आर्किटेक्चर' या विषयावर ऑनलाईन वार्षिक रिर्फेशर (ए.आर.पी.आय.टी.) अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोळा आठवड्यांचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला असून, त्यामध्ये चाळीस तास शिकविल्या जाणार आहे. व्हिडीओ व इतर ई-साम्रुगी त्यामध्ये असणार असून दि. १ डिसेंबर, २०२० ते ३१ मार्च, २०२१ पर्यंत अभ्यासक्रमाचा कालावधी असणार आहे. अभ्यासक्रमासाठी नोंदणी दि. २० नोव्हेंबर, २०२० पासून सुरु झालेली आहे.

अभ्यासक्रम स्वयम प्लॅटफॉर्म वर मूक फॉर्ममध्ये उपलब्ध असणार असून चाळीस तासांपैकी वीस तास व्हीडीओ लेक्चर्स आणि उर्वरित वीस तासांमध्ये ई-कन्टेन्ट, असाईन्मेन्ट असणार आहे. भारतातील विख्यात शैक्षणिक तज्ज्ञांकडून ई-कन्टेन्ट विकसित करण्यात आले आहे. तरी ज्यांना यामध्ये सहभागी व्हावयाचे आहे, त्यांनी आपली नोंदणी https://onlinecourses.swayam2.ac.in/arp20_ap26/preview या लिंकवर करावी. अधिक माहितीसाठी केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर (०७२१-२६६८१७४) व समन्वयक प्रा. सुहास पाचपांडे (९५४५४४८०६२) यांचेशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी